# निवीदा सुचना

**जिल्हा व सत्र न्यायालय पुसद, या कार्यालयातील कागदी वेस्ट पेपरची रद्दी विकावयाची आहे करीता ज्या लोकांना रद्दी विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निवीदा या कार्यालयास दि. २८/०८/२०२५ चे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावी. त्यानंतर कोणतीही निवीदा स्विकारण्यास येणार नाही.**

**कागदी रद्दी विकत घ्यावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१. जमा असलेली कागदी रद्दी अंदाजे १५०० किलो आहे.

२. निविदेमध्ये दर्शविलेल्या रद्दीचा भाव हा कमीत कमी प्रती १८ किलो प्रमाणे लिहावा.

३. संपूर्ण मालाची किंमत एकमुक्त द्यावी लागेल.

४. ज्यांना या कार्यालयात निविदा सादर करावयाच्या असतील त्यांनी निविदेसोबत अनामत रक्कम ५,०००/—( अक्षरी पाच हजार रूपये फक्त) स्वतः जमा करावी. त्याशिवाय कोणतीही निविदा विचारात घेतली जाणार नाही.

५. खरेदीदाराकडुन रद्दी कागदाचे वजन करतेवेळी त्याने अचुक वजन दर्शविणारे व नियंत्रण वजणे व मापे किंवा इलेक्टॉनिक्स मॅट्रीक्स काटा वापरण्याबाबत खरेदीदारास निर्देश देणे बंधनकारक आहे.

६. ज्या खरेदीदाराची निवीदा मंजूर होईल त्यांनी कागदी रद्दी मोजून घेण्याकरिता तराजु वजन काटा व सर्व माल भरण्याकरिता पोत्यांची व्यवस्था करून तो माल येथून नेण्याची व्यवस्था करावी.

७. निविदा मंजुर झाल्याचे कळल्यापासून माल तीन दिवसाच्या आत किंवा वाढविलेल्या मुदतीच्या आत उचलून न्यावा लागेल. तसे न केल्यास नवीन निविदा पुन्हा बोलाविण्यात येईल व माल विकल्या जाईल.

८. असे करताना सरकारला जे काही नुकसान होईल ते प्रथम ज्यांची निविदा मंजूर झाली होती व ज्याने माल उचलून नेला नाही, त्याची अनामत रक्कम सरकारला जप्त (फॉरफिटेड) करण्यात येईल व झालेल्या नुकसानाची रक्कम त्यांचे कडुन वसूल करण्यात येईल.

९. कोणतीही निविदा कारण न दाखविता नामंजुर करण्याचा अधिकार मा. जिल्हा न्यायाधीश—१ व अति. सत्र न्यायालय, पुसद यांना राहील.

करिता आदेशार्थ सादर प्रस्तुत.

आदेशानुसार,

जिल्हा व सत्र न्यायाधीश—१,
पुसद